पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 13/12/2019 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. देवलापार :- दिनांक 12/09/2019 रोजी सपोनि प्रविण बोरकुटे, ठाणेदार पो. स्टे. देवलापार हे स्टाफसह पो. स्टे. ला हजर असतांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा चोरबाहुली शिवारातील तलावाच्या परीसरात मोहाफुल दारू गाळयाकरीता मोहाफुल सडवत आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरून मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नयन आलुरकर व सपोनि प्रविण बोरकुटे, ठाणेदार पो. स्टे. देवलापार व स्टॉफ यांचासह चोरबाहुली येथील महिला मंडळसह चोरबाहुली शिवारातील तलाव परिसराची पाहणी करीत असतांना तलावाच्या काठालगत झाडीझुडपात लपवुन ठेवलेले मोहाफुलाने भरलेल्या प्रत्येकी 200 लीटर 30 प्लॉसटीक ड्रम मिळुन आले. तसेच तलावाच्या आत मध्ये असलेल्या बेटासारख्या झाडीझुडपात मोहाफुलाच्या सडव्याचे भरलेले प्रत्येकी 200 लीटर 60 प्लॉसटीक ड्रम तसेच आणखी सदरची मोहिम तेज करून परीसराची पाहणी केली असता तलावाच्या डाव्या बाजुच्या जंगलात झुडपाच्या जाळीत प्लॉस्टीक कापडाच्या पन्नीत 200 लीटर 80 प्लॉस्टीक पन्नी मोहाफुलाने भरलेल्या मोहाफुल सडवा मिळून आला. तसेच तलावाच्या समोरील भागात पाहणी केली असता तलावाच्या किनाऱ्याच्या जंगलातील नाल्या जवळच्या जाळीत मोहाफुलाने भरलेल्या मोहाफुल सडवा 30 पोते व त्याच्या लगत जमीनीत गडा खोदुन प्लॉस्टीक पन्नीत 70 बॅगा मोहाफुल सडव्याने भरलेल्या मिळुन आल्या. तसेच इतर ठिकाणी शोध घेतला असता एकुण 310 बॅगा व प्लॉस्टीक ड्रम मिळुन आले. प्रत्येकी 100 कि. ली. प्रमाणे 6200 किलो. प्रत्येकी 100 कि. ली. प्रमाणे 6,20,000/—रू. चा मोहाफुल रसायन सडवा व मोहाफुल गाळण्याचे इतर साहित्य कि. 2,50,000/—रू. असा एकुण 8,70,000/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि प्रविण बोरकुटे, पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपीतांविरुध्द अप क्र. 375/19 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये नोंद करण्यात आले. गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास सपोनि श्री. प्रविण बोरकुटे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीमती नयन आलुरकर यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. बोरकुटे, पोउपनि के.जी. पुंजरवाड पोना मोरेश्वर नागोसे, सतिश नागपुरे , गजानन माहुरे, संदीप नागोसे, दिलीप टेकाम, पोशि गजानन जाधव, रमेश खरकटे यांनी चोरबाहुली येथील महिलामंडळ यांचे मदतीने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर